दि. २०/०१/२०२५

**वार्षिक अहवाल**

**ग्रंथालय**

**अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले**

**ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

सन २०२४-२५ या वर्षात **नवीन शैक्षणिक धोरण** अवलंब झाल्याने ग्रंथालयात प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान, बी. बी. ए. बी. सी. ए. या वर्गांसाठी नवीन क्रमिक पुस्तकांची खरेदी करण्यात आली. अपेक्स मुंबई यांच्या कडून **४० मासिके** खरेदी करण्यात आली. ग्रंथालयाची एकूण ग्रंथसंपदा **७५ हजार** हून अधिक झाली आहे. ग्रंथालयात या शैक्षणिक वर्षात अनेक पुस्तकांचे दान प्राप्त झाले यात डॉ. अविनाश शेळके दालन, अकोले विशेष दालन, महाराजा सयाजीराव गायकवाड दालन स्थापन करण्यात आले. महाविद्यालयाच्या अमृतमहोत्सवी वर्षा निमित्त **'सुवर्ण अगस्त्य'**, मा. मधुकररावजी पिचड साहेबांचा गौरवग्रंथ **'कळसूबाईचा शिखरयात्री'** या पुस्तकाचे **ग्रंथालयाच्या वेबसाईटवर प्रकाशन** करण्यात आले. श्री. सिद्धिविनायक गणपती मंदिर ट्रस्ट, प्रभादेवी, मुंबई यांच्या **पुस्तक पेढी** योजनेचा लाभ अनेक गरजू विद्यार्थ्यांना मिळत आहे. अगस्ति ग्रंथालयाच्या **युट्युब चॅनलवर** वाचन प्रेरणा दिनानिमित्त व्हिडीओ स्वरुपात पुस्तक परीक्षणे अपलोड करण्यात आले. **डेलनेट, नवी दिल्ली व एन-लिस्ट** द्वारे ग्रंथालयात **३० लाखाहून अधिक इ-बुक्स व ६०००** हून अधिक इ-जर्नल्सला एक्सेस मिळत आहे. यावर्षी ग्रंथालयाची नवीन वेबसाईट https://akrc.agasticollege.edu.in तयार करण्यात येणार आहे.

**वार्षिक अहवाल**

**प्रा. प्रदीप बच्छाव (ग्रंथपाल)**

**अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले**

**ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

प्रा. प्रदीप बच्छाव यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा **ASPIRE Research Mentorship Project** – "Compilation of online descriptive catalogue of unique marathi titles hold by college libraries" **एक लाख सत्तर हजार** अनुदान प्राप्त करून पूर्ण केला. या प्रोजेक्टचा लाभ आपल्या महाविद्यालयासोबातच संगमनेर नगरपालिका कला, डी. जे. मालपाणी वाणिज्य, बी. एन. सारडा विज्ञान महाविद्यालय, एड. एम. एन. देशमुख कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय राजूर व सहकार महर्षी भाऊसाहेब संतूजी थोरात कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, संगमनेर यांना होत आहे. प्रा. प्रदीप बच्छाव यांनी दि. ११/१२/२०२४ ते २४/१२/२०२४ या कालावधीत **उत्तर बंगाल विद्यापीठातून** ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयात **अ**+ श्रेणीत **रिफ्रेशर कोर्स** पूर्ण केला. **वाचन संकल्प महाराष्ट्राचा** या उपक्रमांतर्गत **पुस्तक परीक्षण पोर्टल प्रोजेक्ट** , जयकर ज्ञानस्त्रोत केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे साठी प्रा. प्रदीप बच्छाव यांची **ट्रेनिंग व टेक्निकल सपोर्ट समन्वयक** म्हणून निवड झाली. या परीक्षण पोर्टल चा लाभ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी **सलग्न महाविद्यालयातील वाचकांना** होत आहे.

**वार्षिक अहवाल**

**प्रा. प्रदीप बच्छाव (ERNET Coordinator)**

**अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले**

**ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

आपल्या महाविद्यालयाचे **नवीन संकेतस्थळ** www.agasticollege.edu.in तयार करण्यासाठी अरनेट, **(ERNET - Educational and Research Network, Govt. of India)** नवी दिल्ली (**शासकीय डोमेन रजिस्ट्री,** भारत सरकार) यांचेकडून नवीन डोमेन खरेदी करण्यात आला. सध्याचे **डोमेन कमर्शिअल** .com असून यावरील वेबसाईट अद्ययावत करण्यासाठी **नवीन डोमेन व वेब स्टोरेज** खरेदी करण्यात आला. तसेच अकोले तालुका एज्युकेशन सोसायटी, अकोले संस्थेसाठी https://atesakole.org हे **संकेतस्थळ विकसित** करण्यात आले. वरील डोमेन सेटअप झाला असून त्यावर लवकरच **महाविद्यालयाचे, आय. क्यू. ए. सी. चे व ग्रंथालयाचे नवीन अद्ययावत संकेतस्थळ** विकसित करण्यात येईल.

**ERNET Coordinator**

**वार्षिक अहवाल**

**प्रा. प्रदीप बच्छाव (CoreCampus ERP Coordinator)**

**अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले**

**ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

आपल्या महाविद्यालयाचे Admission Portal सर्व्हर हे मे. अगस्ति टेक्नोलॉजी, पुणे यांनी तयार केले असून त्यासाठी यावर्षी नवीन क्लाऊड सर्वर स्पेस खरेदी केला. यामुळे सर्व प्रशासकीय कर्मचारी यांना काम करणे व विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेणे, कागदपत्रे अपलोड करणे सोपे झाले आहे. https://acsjunior.corecampus.in/ ही कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्याची लिंक असून https://acssenior.corecampus.in/ ही वरिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्याची लिंक आहे.

**(CoreCampus ERP Coordinator)**

**वार्षिक अहवाल**

**प्रा. प्रदीप बच्छाव (UGC and PM-USHA Coordinator)**

**अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रुपवते विज्ञान महाविद्यालय, अकोले**

**ता. अकोले, जि. अहिल्यानगर**

आपल्या महाविद्यालयाने Pradhan Mantri Ucchatar Shiksha Abhiyan (PM-USHA) साठी अर्ज दाखल केला. त्यासाठी PM-USHA टीम मुंबई येथे पाच कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यास गेली होती.

यु. जी. सी. च्या पूर्वी घेतलेल्या अनुदानाचा होशोब इ-मेल द्वारे व ऑनलाईन मीटिंग द्वारे यु. जी. सी. दिल्ली ऑफिसला पाठविण्यात आला. त्यासाठी प्रबंधक श्री. सीताराम बगाड, डॉ. पी. के. घुले, प्रा. डॉ. राहुल भोसले, प्रा. अश्पाक पठाण यांचे सहकार्य लाभले.

**(UGC and PM-USHA Coordinator)**